भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ४४७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १४/०६/२०१७

**१) गैरकायदयाची मंडळी जमवुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन थापड बुक्यांनी मारपिट करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १२/०६/२०१७ चे २०.४५ वा. दरम्यान यातील आरोपीतांनी गैरकायदयाची मंडळी जमवुन फिर्यादीला तिचे प्रेम विवाहीत पती पासुन घटस्फोट दे असा दबाव टाकुन फिर्यादीला व तिचे पतीला अडवुन थापडबुक्यांनी मारहान करुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन तिला व तिचे पतीला जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी सौ. धनश्री नितीन मेश्राम वय १८ वर्ष, रा. लाखांदुर याचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ३४१,२९४,१४३,१४७,३२३,५०४,५०६ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. खंडाते पो.स्टे. लाखांदुर हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) पर्स मधील सोन्याचे दागीणे व नगदी पैश्याची चोरी . :–**

दिनांक १०/०६/२०१७ चे ०९.०० ते ९.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी सौ. विद्या सुनील कावळे वय ४४ वर्ष, रा. रामनगर वर्धा ही आपले नातेवाईकाकडे लाखांदुर येथे लग्न कार्या करीता आली असता यातील फिर्यादी ही आंघोळ करीत असतांना पर्स ही घराचे बाथरुमचे साईडला ठेवलेल्या पर्स मधील सोन्याचे दागीणे १ सोनयाची चपलाकंठी २ तोडे, १ सोन्याचा हार २ तोडे ३ ग्रॅम, नगदी ४०००/–रु. असा एकुण ५६,०००/–रु. चा माल कोणीतरी अज्ञात चोराने कुणी नसल्याची संधी साधुन चोरुन फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे लाखांदुर येथे कलम ३८० भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. खंडाते पो. स्टे. लाखांदुर हे करीत आहेत.

**३) ट्रक चालकांच्या निष्काळजीपणामुळे मोटार सायकल चालकास समोरुन धडक देवुन जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १३/०६/२०१७ चे १९.४५ वा. दरम्यान यातील आरोपी चालकाने आपले ताब्यातील ट्रक भरधाव वेगाने, निष्काळजीपने चालवुन आपले साईडने जात असलेल्या हिरो होन्डा सिडी डॉन मोटार सायकल क्रमांक एमएच ३६/००७३ ला समोरुन धडक दिल्याने मोटार सायकल चालक प्रशांत उर्फ राजा डोमेश्वर कडव वय २५ वर्ष, रा. गांधी वार्ड देव्हाडी यास जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी संजय धनराज धुर्वे वय २७ वर्ष, रा. गांधी वार्ड देव्हाडी यांचे रिपोर्ट वरुन पोस्टे तुमसर येथे कलम २७९,३३७ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. माहुर्ले पो. स्टे. तुमसर हे करीत आहेत.

**४) शेतामध्ये धुऱ्या जवळ मृत अवस्थेत इसम मिळुन आल्याने मर्ग नोंद :–**

दिनांक १३/०६/२०१७ चे ११.०० वा ते १७.३० वा. दर. यातील मृतक दयाराम श्रीराम बांडेबुचे वय ६२ वर्ष रा. पहेला हा आपले शेता मध्ये शेतीचे कामा करीता ११.०० वा गेला असता शेतीचे बांधीत धुऱ्या जवळ हिरव्याचे झाडाखाली मृत अवस्थेत १७.३० वा. मिळुन आल्याने फिर्यादी केवळराम मारोती बांडेबुचे वय ५३ वर्ष रा. पहेला यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पो.स्टे अडयाळ येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भोंगाडे पोलीस स्टेशन अडयाळ हे करीत आहेत.

**५) घराच्या समोरील दाराचा कोंडा तोडुन घरात ठेवलेल्या गोदरेज आलमारी व सामानाची पाहणी करुन चोरी करण्याचा प्रयत्न केल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक १२/०६/२०१७ चे २३.३० ते १३/०६/२०१७ चे ०२.०० वा. दर. यातील फिर्यादी रामा तानबा सुदामे वय ६५ वर्ष, रा. कांद्री हा आपले मुलीच्या गावी घराला ताला लावुन गेला असता कोणीतरी अज्ञात चोराने कुणी नसल्याची संधी साधुन फिर्यादीचे बंद घराचा समोरील दाराचा कोंडा तोंडुन आत प्रवेश करुन घरात ठेवलेल्या गोदरेज आलमारी व इतर सामानाची पाहणी केली परंतु घरात कोणतेही सोन्या, चांदीचे दागीणे मिळुन आले नाही. व चोरीचे प्रयत्न केल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पो.स्टे आंधळगाव येथे कलम ४५७,३८०,५११ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. सोलंकी पोलीस स्टेशन आंधळगाव हे करीत आहेत.

**६) एटीएम कार्ड स्विप करुन पैसाची फसवणुक केल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक ०१/०६/२०१७ चे १५.०० ते १५.३० वा. दर. यातील फिर्यादी ही एटीएम कार्ड घेवुन इंडीकॅश बॅकेच्या एटीएम मध्ये जावुन रक्कम पाहण्याकरीता आपले कडील कार्ड स्विप करुन रक्कम काढण्याचा प्रयत्न करीत असतांना यातील अनोळखी इसमाने मी पैसे काढुन देतो व कार्ड घेवुन स्विप करुन फिर्यादीस पिन टाकण्यास सांगीतले त्या दरम्यान आरोपीने हात चालाखीने आपले कडील एटीएम फिर्यादीस देवुन तिचे एटीएम कार्ड स्वत: कडे ठेवुन व फिर्यादीचे अकाऊट मधुन ३८,०००/—रु. एटीएम व्दारे काढुन फसवणुक केल्याने फिर्यादी कु. प्रियंका नाना गजभिये वय २१ वर्ष रा. उत्तम नगर लाईन अमरावती हिचे तोंडी रिपोर्ट वरुन पो.स्टे मोहाडी येथे कलम ४२० भादंवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनी. कुंभरे पोलीस स्टेशन मोहाडी हे करीत आहेत.

**७) अंधराचा फायदा घेवुन दखलपात्र गुन्हा करण्याच्या इरादयाने संशयास्पंद स्थितीत मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १३/०६/२०१७ चे ००३.० वा. दरम्यान यातील आरोपी हा अंधाराचा फायदा घेवुन आपले अस्तीत्व लपवितांना संशयरित्या मिळुन आल्याने त्यास घटनास्थळी हजर राहण्याचे कारण विचारले असता त्याने कोणतेही समाधान कारक उत्तर न दिल्याने आरोपी हा कोणता तरी दखलपात्र गुन्हा करण्याचे इरादयाने संशयास्पंद स्थितीत मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोउपनी. गदादे यांचे रिपोर्ट वरुन पोस्टे पवनी येथे कलम १२२ मपोका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. गदादे पो. स्टे. पवनी हे करीत आहेत.

**८) प्रकृती खराब झाल्याने ट्रक चालकांचा मृत्यु. :—**

दिनांक १३/०६/२०१७ चे १३.०० वा. दर. यातील फिर्यादी डुलीराम रघुनाथ भैसारे वय ४६ वर्ष, रा. गडेगाव (पोलीस पाटील) यास माहीती मिळाली की ट्रक क्र. डब्लु बी ४१/६९७० हा ट्रक थांबलेला आहे व त्या ट्रक मध्ये कोणीतरी व्यक्ती मरण पावलेला आहे व त्याचा वास येत आहे. अशी माहीती मिळाल्याने फिर्यादी हे घटनास्थळी जावुन पाहणी केली असता ट्रकचे कॅबीन मध्ये ड्रायव्हर साईडचे सिटवर एक इसम मृत पावलेल्या स्थितीत दिसला असता त्याचे जवळील सॅमसंग कंपनीचे मोबाईल चालु स्थितीत असल्याने मोबाईवरुन संपर्क केला असता मृतकची पत्नी उलवंत कौर हिने पती मृक्तार सिंग रा. कलकत्ता हे असल्याचे सांगुन त्याची प्रकृती दोन दिवसापुर्वी खराब झाल्याने आराम करीत आहोत आहो असे मृतकने सांगितले होते. अश्या फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पो.स्टे लाखनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. उईके पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत

९) अवैध देशी/जुगार दारु अडयावर धाडी . :–

दिनांक १३/०६/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे भंडारा, जवाहरनगर, तुमसर, साकोली, पवनी व लाखांदुर येथे अवैध देशी दारु/ जुगार अडयावर धाडी घालुन एकुण १० गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन ४५ लिटर हातभट्टी दारु किंमती ४०००/–रु, २५ लिटर २० मिली लिटर देशी दारू किंमती ६,९९८/–रु. व जुगारातुन किंमती ८०९५/–रु. असा एकुण किंमती १९०९३/–रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

१०) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक १३/०६/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १७१ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०९ तीन सिटर वाहनांवरती १५ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती १४७ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी. ८८०५६५७२६२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.